


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १२८ ●गुरूवार, दि. ०७ ऑगस्ट २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955



# बाळासाहेबांच्या विचारांची मशाल वाहणारा निष्ठावान शिवसैनिक

**शेतकरी पुत्र, संघर्षशील योद्धा आणि एक विश्वासार्ह आधारस्तंभ म्हणून ओळखले जाणारे परमेश्वर सातपुते सर यांचा आज वाढदिवस! कार्यकर्त्यांसाठी ही केवळ एक शुभेच्छा देण्याची संधी नसून, त्यांच्या प्रेरणादायी वाटचालीची आठवणही आहे. ग्रामीण मातीतून उगम पावलेला एक साधा शेतकरी पुत्र, शहरात शिक्षणासाठी येतो आणि बाळासाहेब ठाकरे गटात सक्रिय होत कार्यक्षेत्रात आपला ठसा उमटवतो. कार्याच्या निष्ठेची पावती म्हणून ते जिल्हाप्रमुखपदाच्या जबाबदारीवर पोहोचतात. राजकारणात चढ-उतार ही अपरिहार्य गोष्ट असते, पण पक्षवाढ, कार्यकर्त्यांची प्रगती आणि लोकसेवा हीच खरी दिशा मानून, सातपुते सर आपल्या भूमिकेत सदैव ठाम राहिले. पक्ष बदलण्याची स्पर्धा जिथे सुरु आहे, तिथे सातपुते सर मात्र बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांची मशाल खांद्यावर घेत, उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे निष्ठावान सैनिक म्हणून उभे आहेत. या वाढदिवसानिमित्त त्यांना आरोग्य, दीर्घायुष्य आणि 'हत्तीचे बळ' लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना!**







शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खंदे, निष्ठावान आणि जनतेच्या मनात घर करणारे माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांचा वाढदिवस म्हणजे संपूर्ण जिल्ह्यासाठी साजरी करणारी एक प्रेरणादायी पर्वणीच होय. सातपुते सर यांनी आपल्या नेतृत्वात, जिद्दीने, चिकाटीने आणि कार्यकर्त्यांना सतत बळ देत शिवसेनेच्या कार्याचा झेंडा बुलंद ठेवला. जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून सामान्य जनतेसाठी लढा देणारा, त्यांच्या अडचणींना हाताळणारा एक कार्यकर्ता म्हणून सरांनी स्वतःला सिद्ध केले. केवळ पक्षासाठी नव्हे तर समाजासाठी, शेतकरी, कामगार, युवक, महिला यांच्यासाठी एक विश्वासू आधारस्तंभ म्हणून त्यांचं योगदान लक्षणीय आहे. त्यांचे कार्यकर्त्यांवरचं प्रेम, संकटसमयी दिलेला आधार, प्रत्येक निर्णयामागची लोकहिताची भावना, हेच त्यांच्या यशाचं गमक आहे. शिवसेनेच्या मूल्यांशी एकनिष्ठ राहून त्यांनी अनेक संकटांचा सामना केला, पण कधीही आपली निष्ठा आणि विचारसरणी डगमगू दिली नाही. सर हे केवळ राजकारणातील एक नेते नसून, समाजकारण, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रातही त्यांनी मोलाची कामगिरी केली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक युवकांनी राजकारणात, समाजकारणात आपली वेगळी ओळख निर्माण केली. त्यांचा सल्ला, सहकार्य आणि अनुभव आजही नव्या पिढीच्या वाटचालीला दिशा देतो.आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या कार्याची उजळणी होत आहे. त्यांच्या जीवनातील हा विशेष दिवस त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि अजून अधिक यशाचे शिखर गाठावी हीच वाढदिवसानिमित्त शुभेच्छा ...






### खा.सोनवणे व आमदार संदीप क्षीरसागर यांच्या विजयासाठी प्रचंड कष्ट

लोकसभा निवडणुका त बीड मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाने बजरंग सोनवणे यांना उमेदवारी घोषित केली महाविकास आघाडीच्या माध्यमातून काम करत असताना खासदार बजरंग सोनवणे यांच्या विजयात परमेश्वर सातपुते सरांचा खारीचा वाटा आहेच मात्र निवडणूक काळात इमाने इतबारे पक्षाच्या भूमिकेशी एकनिष्ठ राहत खासदार बजरंग सोनवणे साठी जीवाचे रान केले तर विधानसभा निवडणुकात बीड विधानसभेची जागा संदीप क्षीरसागर यांच्याकडे होते. वाड्यावर आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासाठी नवरात्र प्रयत्न करत महा विकास आघाडीचे उमेदवार संदीप क्षीरसागर यांना विजयी करण्यासाठी परमेश्वर सातपुते सर प्रचंड प्रयत्नशील होते. त्यांच्या संघटन बांधणी व सर्व सामान्य लोकांशी असणारी नाळ यामुळे महाविकास आघाडीचे लोकसभेत तर विधानसभेत आमदार निवडून आले.

### समाजसेवेची मशाल हाती

माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी कधीही पदाचा लोभ ठेवला नाही. साधारण शेतकरी कुटुंबातून राजकारणात आलेले परमेश्वर सातपुते सर यांनी समाजसेवेत कधीही खंड पडून दिला नाही सतत लोकांच्या अडचणी व समस्या सोडवण्याचे काम केले आहे. समाजसेवेची मशाल हाती घेतली असून कट्टर शिवसैनिक म्हणून त्यांची जिल्ह्यात नव्हे तर राज्यात ओळख आहे. एकीकडे पद नसल्याचं अनेकांना दुःख आहे तर कोलांट उड्या मारत स्वतःचा हित जोपासणार आहे अनेक आहेत. मात्र पक्षाची भूमिका घेत जिल्हाभरात काम करणारे शेतकरी नेते परमेश्वर सातपुते सर यांनी आपल्या कार्यात कधीही खंड पडू दिला नाही. लोकांची कामे करत असताना दिवस किंवा रात्र पाहिली नाही. पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी हाती दिलेली मशाल तेवत ठेवण्याचे काम परमेश्वर सातपुते सर यांच्याकडून केले जात आहे.

### पक्षाशी एकनिष्ठ वरिष्ठ दखल घेतीलच !

राज्यात एकीकडे स्वतःचा फायदा बघत अनेक नेते पद गेल्यानंतर तात्काळ दुसरीकडे उडी मारतात मात्र परमेश्वर सातपुते सर यांनी शिवसेनेचा भगवा झेंडा खांद्यावर घेतला असून स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या कार्याची प्रेरणा परमेश्वर सातपुते सरांच्या मस्तकात आहे. यामुळे कितीही संकट आले तरीही पक्षाशी एकनिष्ठ असणारे परमेश्वर सातपुते सर यांची दखल वरिष्ठ घेतीलच. बीड जिल्ह्यात पक्षाने सोपवलेली कामे एकनिष्ठपणे करत असताना कधीही कोणावर अन्याय होणार नाही याची कायम दक्षता घेणारा हळव्या मनाचा राजा व दिलदार माणूस म्हणजे परमेश्वर सातपुते सर.

### चांदा ते बांदा कामे

सामान्य शेतकरी कुटुंबातील ग्रामीण भागातून येणारा हा नेता पाहिला भिंगरी बांधत पक्षाची ध्येय धोरणे सामान्य लोकापर्यंत पोहोचविण्याचे काम करत आहे. शेतकऱ्यांच्या अनेक प्रश्नावर त्यांनी आंदोलने केली आहेत किसान जिल्हाध्यक्षाच्या कार्यकाळात शेतकऱ्यांच्या हितांच्या निर्णयासाठी उग्र आंदोलनासह रास्ता रोको व जन मोर्चे काढण्यात आले. पक्षाची कायम एकनिष्ठ ठेवत पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे अत्यंत निकटवर्तीय म्हणून परमेश्वर सातपुते सरांची ओळख आहे. पक्षात काम करत असताना अनेक चढ-उतार येतात ते मान्य करत पक्षाची एकनिष्ठ ठेवणारे आज किती नेते आहेत याचा विचार केला असता परमेश्वर सातपुते सरांनी बीड जिल्ह्यात एक वेगळाच दरारा निर्माण केला आहे.

### जगदंबा अर्बन च्या माध्यमातून अनेक गोर गरीब तरुणांनच्या हाताला काम !

शेतकरी पुत्र परमेश्वर सातपुते सर यांनी राजकारणासोबत उद्योग व्यवसायातही तरुणांना संधी निर्माण करून दिली जगदंब अर्बन बँकेच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील तरुणांना रोजगारांच्या संधी उपलब्ध करून दिल्या. एकीकडे राजकारण दुसरीकडे समाजकारण तर तिसरीकडे उद्योग व्यवसायातही विचारवंत परमेश्वर सातपुते सर यांनी आपल्या कामाचा ठसा उमटविला आहे. प्रत्येक दिवशी होणारी धावपळ सकाळ ते संध्याकाळ अहोरात्र सुरू आहे प्रत्येकाच्या अडीअडचणी कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी जिल्हाभरात विविध कार्यक्रम यामध्ये सातपुते सर




व्यस्त असताना जगदंब अर्बन च्या माध्यमातून तरुणांना समरोजगार व रोजगार उपलब्ध करून दिला आहे.

### पिंपळनेर सर्कल मधील विकासाच्या कामांना गती देणार

माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर हे पिंपळनेर सर्कल मधील आपल्या गावासाठी बऱ्याच कल्पना व विकासाचे अनेक प्रोजेक्ट डोळ्यासमोर ठेवून त्यांनी कामे सुरू केली विरोधी पक्षात असतानाही विकास निधी खेचून आणण्यात परमेश्वर सातपुते सरांना महारथ आहे. आपल्या गावाप्रती व सर्कल प्रति विकासाची काम करण्याची प्रबळ इच्छा ठेवणारे परमेश्वर सातपुते सर हे पिंपळनेर सरकारमधील प्रत्येक वाडी वस्ती व तांड्यावर विकास खेचून आणणार अनेक वेळा त्यांच्या मुखातून पिंपळनेर सर्कल मधील कामाबद्दल चर्चा होतच असते या वाढदिवसानिमित्त त्यांनी संकल्प केलेली सर्व कामे पूर्ण व्हावी हीच अपेक्षा.

### पक्ष वाढीसाठी कष्ट घेणारा नेता

सामान्य घरातील एका शेतकऱ्याचा मुलगा ग्रामीण भागातून शहरात येऊन शिवसेना पक्षात काम करतो व जिल्हा प व जिल्हा प्रमुख पदावर विराजमान होतो हे कार्य कुशलताच म्हणावी लागेल. पक्षाने जे काम सोपवले ते निष्ठेने केले. जिल्हाध्यक्ष असताना अनेक सोसायटी शिवसेनेच्या ताब्यात घेतल्या शेतकऱ्यांचे प्रश्न मांडले . शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची भूमिका घेऊन काम करत असताना अनेक चढ-उतार येत आहेत व येत राहतील राजकारण एका बाजूला व दुसऱ्या बाजूला राहिले ते संघर्ष मात्र पक्ष वाढीसाठी सतत प्रयत्न करणारा नेता म्हणून परमेश्वर सातपुते सराकडे पाहिले जाते. राजकीय नेत्यांना पक्ष बदलण्याची मानसिक आजारच म्हणावा लागेल मात्र परमेश्वर सातपुते सर यांना पक्षात काम करत असताना जिल्हाप्रमुख असो या कार्यकर्ता असो कधीही फरक जाणवला नाही तीच हातोडी तीच चिकाटी व तीच प्रभावी वक्तव्य करणारे परमेश्वर सातपुते सर शिवसेना पक्षाची भूमिका घेऊन जिल्ह्यात ठाण मांडून आहेत.

### सामान्यतेतून असामान्यतेकडे...

**परमेश्वर सातपुते यांचा प्रवास हा सामान्य कुटुंबातून सुरू झाला. लहानशा गावात जन्मलेले, त्यांनी आपल्या सामाजिक जाणिवांचा विकास करत गावपातळीवर कार्य सुरू केले. ग्रामपंचायत सदस्य म्हणून त्यांनी आपल्या गावातील विकासकामांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. लोकांचे प्रश्न समजून घेत त्यावर उपाय शोधणे, हा त्यांचा मुख्य हेतू राहिला.**

### बाजार समिती संचालक म्हणून जबाबदारीची जाणीव

**शेती हा आपल्या देशाचा कणा आहे. सातपुते सरांनी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पद भूषवताना शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेतल्या आणि त्यासाठी कार्यरत राहिले. शेतमालाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले, शेतकरी हा त्यांच्या कामाचा केंद्रबिंदू राहिला.**



### शिवसेना जिल्हा प्रमुख... नेतृत्वाची शिखरं गाठताना

**राजकारणाच्या झगमगाटापेक्षा सामाजिक कार्यात अधिक रस असलेल्या सातपुते सर यांनी शिवसेनेच्या माध्यमातून अधिक व्यापक पातळीवर काम करण्याची संधी मिळवली. जिल्हा प्रमुख पद भूषवताना त्यांनी पक्षाची ध्येयधोरणं खेड्यापाड्यात पोहोचवली. अनेक तरुणांना प्रेरणा देत त्यांना सामाजिक कार्यात सामावून घेतलं .एक नेता, जो लोकांसाठी जगतो: परमेश्वर सातपुते हे केवळ पदासाठी नाही, तर लोकांसाठी जगणारे नेता आहेत. त्यांचं साधेपण, सर्वसामान्यांशी असलेला घट्ट संवाद, आणि प्रामाणिकपणा ही त्यांच्या नेतृत्वाची खरी ताकद आहे**





# जनतेचा आवाज ठरलेले नेतृत्व

## शिवसेनेचे मा. जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर

**शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक खूप खूप शुभेच्छा**





शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खंदे, निष्ठावान आणि जनतेच्या मनामनात घर करणारे माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांचा वाढदिवस म्हणजे संपूर्ण जिल्ह्यासाठी साजरी करणारी एक प्रेरणादायी पर्वणीच होय.

सातपुते सर यांनी आपल्या नेतृत्वात, जिद्दीने, चिकाटीने आणि कार्यकर्त्यांना सतत बळ देत शिवसेनेच्या कार्याचा झेंडा बुलंद ठेवला. जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून सामान्य जनतेसाठी लढा देणारा, त्यांच्या अडचणींना आपल्या प्रश्नांप्रमाणे हाताळणारा एक कार्यकर्ता म्हणून सरांनी स्वतःला सिद्ध केले. केवळ पक्षासाठी नव्हे तर समाजासाठी, शेतकरी, कामगार, युवक, महिला यांच्यासाठी एक विश्वासू आधारस्तंभ म्हणून त्यांचं योगदान लक्षणीय आहे. त्यांचे कार्यकर्त्यांवरचं प्रेम, संकटसमयी दिलेला आधार, प्रत्येक निर्णयामागची लोकहिताची भावना, हेच त्यांच्या यशाचं गमक आहे. शिवसेनेच्या मूल्यांशी एकनिष्ठ राहून त्यांनी अनेक संकटांचा सामना केला, पण कधीही आपली निष्ठा आणि विचारसरणी डगमगू दिली नाही.

सर हे केवळ राजकारणातील एक नेते नसून, समाजकारण, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रातही त्यांनी मोलाची काम गिरी केली आहे. त्यांच्या म ार्गदर्शनाखाली अनेक युवकांनी राजकारणात, समाजकारणात आपली वेगळी ओळख निर्माण केली. त्यांचा सल्ला, सहकार्य आणि अनुभव आजही नव्या पिढीच्या वाटचालीला दिशा देतो. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या कार्याची उजळणी होत आहे. त्यांच्या जीवनातील हा विशेष दिवस त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि अजून अधिक यशाचे शिखर गाठवो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. परमेश्वर सातपुते सर हे एक विचारवंत, जडणघडण करणारे नेतृत्व, आणि निष्ठेचा खरा अर्थ समजावणारे व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा देताना, आम्हाला आनंद वाटतो की असे एक सच्चे नेते आपल्या जिल्ह्याला लाभले आहेत.

परमेश्वर सातपुते सर, यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

आपल्या नेतृत्वाखाली जिल्हा नेहमीच प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत राहो, हीच अपेक्षा.



**शुभेच्छुक : अभिजीत जिजाभाऊ चिंचकर**

◆ पान ४ वरून पुढे...

## लोककला केंद्रात...

आली आहे.यावेळी दोन पीडीत महिलांची सुटका करुन वेश्या व्यवसाय चालविणाऱ्या तिघांवर केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनैतिक वाहतूक प्रतिबंध कक्ष बीडच्या पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव यांना गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की , पोलीस ठाणे केज हद्दीत सारुळ गाव येथे रेणुका कलाकेंद्रा मधे दोन महीला बाहेरून आणून वेश्या व्यवसाय करीत आहेत. ही माहिती वरिष्ठांना देण्यात आली. त्यावरून वरिष्ठांनी नियंत्रण कक्षाचे पोलीस निरीक्षक देवीदास भागवत गात यांना सदर ठिकाणी छापा टाकण्याचे लेखी आदेश दिले. त्यावरून झख गात व अ. मा. वा. प्र. कक्षाच्या प्रमुख झडख पल्लवी जाधव व त्यांचा संपूर्ण स्टाफ यांनी डमी ग्राहक व पंचासह सदर ठिकाणी सापळा रचून , डमी ग्राहकास सदर ठिकाणी पाठवून खात्री केली असता तेथे असलेल्या महिला एजंटने वेश्या गमनासाठी होकार देवून त्यासाठी ७५०० रुपयांची मागणी केली. डमी ग्राहकाने ठरल्या प्रमाणे रक्कम देवून पोलीस पथकास इशारा केला असता, पोलीस पथकाने सदर ठिकाणी छापा मारला. पैसे स्वीकारलेल्या महिलेची झडती घेतली असता डमी ग्राहकाने दिलेल्या नमूद वर्णनाच्या ५०० रू. दराच्या १५ नोटा मिळून आल्याने पंचासमक्ष जप्त केल्या. सदर ठिकाणी दोन पीडित महिला मिळून आल्या. पीडीत महिलांना विश्वासात घेवून चौकशी केली असता , त्यांनी सांगितले की, खराडे नामक महिला व सहकारी शेख शफीक शेख हमीद (वय ३१ वर्ष रा. कुर्बाण अलिशा नगर , दर्गा रोड परभणी), जागामालक रामनाथ ढाकने (फरार, वय ५९ रा. सारूळ )यांनी एका पीडीत महिलेस गुजरात वरून तर दुसरीस बाहेर जिल्ह्यातून आणून , स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी ग्राहकाकडून पैसे घेवून, पीडीत महिलांकडून वेश्या व्यवसाय करुन घेत असल्याचे सांगितले. आरोपी मीना संतोष खराडे हिची दोन पंचा समक्ष झडती घेतली असता, तिच्याकडे डमी ग्राहकाने दिलेल्या १५ नोटा व इतर साहित्य मिळून आले आहे. तिन्ही नमुद आरोपींवर पीडीत महिलांना स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी त्यांना आणून स्वतःच्या ताब्यातील जागेचा वापर करुन त्याच कमाईवर उदरनिर्वाह करुन वेश्याव्यवसाय करण्यास लावले व सदर महिलांचे शोषण करण्याच्या उद्देशाने बोलावले म्हणून त्यांच्या विरुद्ध केज पोलीस ठाण्यात अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ कलम ३,४,५,६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, तसेच दोन पीडित म हिलांची सुटका करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक देविदास गात नियंत्रण कक्ष , पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव , सहायक पोलीस उप निरीक्षक मीरा रेडेकर , महीला पोलीस हवालदार

◆ पान ४ वरून पुढे...

उषा चौरे, शोभा जाधव, पोलीस हवालदार प्रदीप येवले, अशोक शिंदे, पोलीस शिपाई प्रदीप वीर, योगेश निर्धार सर्व नेमणूक अ. मा. वा. प्र. कक्ष यांनी केली.

## महादेव मुंडे...

एसआयटीचे प्रमुख पंकज कुमावत यांनी सोमवारी परळी येथे भेट देऊन तहसील समोरील मैदानात असलेल्या घटनास्थळाची पाहणी केली. यावेळी त्यांच्यासोबत एस.आय.टी. मधील सदस्य आणि परळी शहर पोलीस ठाण्याचे कर्मचारी देखील होते. दुपारी साडेचारच्या दरम्यान घटनास्थळी पोहचलेले पथक रात्री आठ वाजेपयरत घटनास्थळीच होते. यावेळी कुमावत यांनी संपूर्ण घटनाक्रम समजून घेतला, आता यानंतर तपासाला सुरुवात होणार आहे. महादेव मुंडे यांचे मारेकरी २१ महिन्यापासून मोकाटच आहेत. या अनुषंगाने या प्रकरणाच्या तपासाला वेग आले आहे. त्यातच आता या खून प्रकरणाची कुठलीही माहिती असल्यास त्यांनी ती पोलिसांनी द्यावी, असे आवाहन पंकज कुमावत यांनी केलं आहे. बारा गुंठ्याच्या व्यवहारातूनच खून झाला, महादेव मुंडे यांच्या वडिलांची माहिती –राज्यात सध्या गाजत असलेल्या महादेव मुंडे खून प्रकरणाची चौकशीसाठी नियु करण्यात आलेल्या एसआयटीने आता या प्रकरणाची माहिती महादेव मुंडे यांचे भाऊ तथा या प्रकरणाचे फिर्यादी अशोक मुंडे आणि वडील दत्तात्रय मुंडे यांच्याकडून जाणून घेतली. यानंतर अशोक मुंडे यांनी त्यांच्याकडे असलेली संपूर्ण माहिती आम्ही पुढील तपासासाठी दिले असल्याचे सांगितले. तसेच एसआयटीचे प्रमुख कुमावत यांनी आरोपींना गजाआड करणार असल्याचे आश्वासनहि यावेळी दिले. यावेळी महादेव मुंडे यांचे वडील दत्तात्रय मुंडे यांच्याकडून देखील एसआयटीने या प्रकरणाची माहिती जाणून घेतली आणि महादेव मुंडे यांचा खून १२ गुंठे प्लॉटच्या व्यवहारातून झाला असून याच दिशेने या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी ही केलीये.

## आडस, होळ....

जात प्रमाणपत्रे, पाणीबिल भरणा, निवडणूक ओळखपत्रासंदर्भातील सेवा आदी अनेक शासकीय सेवा मिळणार आहेत. त्यामुळे गावातील प्रशासन अधिक कार्यक्षम आणि लोकाभिमुख होणार आहे. या योजनेसाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या निधीचे प्रमाण अनुक्रमे ६० टक्के व ४० टक्के असे राहणार आहे. यातून ग्रामपंचायत इमारतीसाठी २० लाख रुपये आणि नागरी सुविधा खोलीसाठी ५ लाख रुपये असा एकूण २५ लाखांचा निधी प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी मंजूर करण्यात आला आहे. सदर निर्णयामुळे या गावातील प्रशासनाची गुणवत्ता सुधारण्यास मदत होणार असून डिजिटल

◆ पान ४ वरून पुढे...

सेवांचा ग्रामीण भागात प्रसार होणार आहे. स्थानिक नागरिकांसाठी ही सुविधा मोठी दिलासादायक सुरुवात ठरणार आहे. याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे, पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत.

## अजित पवार...

आहेत. यामध्ये चंपावती क्रीडा संकुल पाहणी , श्री क्षेत्र कंकालेश्वर मंदिर परिसर पाहणी करणार आहे. सकाळी ०९.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे आगमन व इमारत बांधकाम पाहणी व महसूल भवनाचे भूमिपूजन करतील. सकाळी १०–०० वा श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग विकास आराखडा सादरीकरण / चर्चा. सकाळी १०.४५ वा. जिल्ह्यातील मुख्य इमारतीच्या Elevation Plan चे सादरीकरण व चर्चा. सकाळी ११.३०स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई –आराखडा सादरीकरण व चर्चा. दुपारी १२.३० ते १.३० राखीव. दुपारी ०१.३० वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बीड येथे आगमन. १) ऊसतोड कामगारांचा मेळावा . २) आरोग्य मित्र योजनेचा शुभारंभ. ३) ग्राम ीण गृहनिर्माण (घरकुल) उहरीं ईीं. दुपारी ०२.४५ वा. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सेवा सुविधा क्रमांक ३, बीड औद्योगिक क्षेत्र, बीड येथे आगमन. दुपारी ०२.४५ वा. Centre for Invention, Innovation, Incubation and Training (CIIIT), By Tata Technologies, Beed चे भूमिपूजन करतील. दुपारी ०३.०० वा. खंडेश्वरी मंदिर परिसर, बीड येथे आगमन. दुपारी ०३.०० ते ०४.०० वा. जिल्ह्यातील वृक्ष लागवड कार्यक्रमास उपस्थित राहतील. सांय ०४.१५ वा. स.मा. गर्गे पत्रकार भवन, तुळजाई चौक, बीड येथे आगमन व नंतर बीड जिल्हा पत्रकार संघाचा कार्यक्रमात उपस्थित राहतील. नंतर मोटारीने प्रयाण . सांय ०५–३० वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, वडवणी, ता. वडवणी, जि. बीड येथे आगमन व कार्यकर्ता मेळाव्यास उपस्थिती. रात्रौ ०९.२५ वा. छत्रपती संभाजीनगर विमानतळ, छत्रपती संभाजीनगर येथे आगमन व ०९.३० वा. विमानाने पूणेकडे प्रयाण करतील.

## 'जिल्हा क्रीडा....

जिल्ह्याचे नाव क्रीडा क्षेत्रात उंचावण्यासाठी खेळाडूंना आवश्यक सोयी–सुविधा देणे गरजेचे आहे. या दृष्टिकोनातून आ.संदिप क्षीरसागर यांचा, जिल्हा क्रीडा संकुल येथे विविध विकास कामे होण्यासाठी गेल्या

◆ पान ४ वरून पुढे...

अनेक दिवसांपासून महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांच्याकडे पाठपुरावा सुरु होता. त्यावर बीड येथे झालेल्या बैठकीत ना.अजितदादांनी जिल्हा क्रीडा संकुलाच्या विकास कामांच्या प्रस्तावाला मंजुरी देऊन २५ कोटी रुपयांचा भरघोस निधी दिला. या निधीतून छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुलात मोठ्या प्रमाणावर विविध विकास कामे केली जाणार आहेत. त्यामुळे आ. क्षीरसागर यांनी ना.अजित दादांचे यांचे आभार मानले आहेत.

## साखळी चोरास...

बीड येथे चोरल्याचे कबुल केले आहे. आरोपी अशोक वसंत सदरे, वय ४८ वर्ष, रा. करीमपुरा साळगल्ली, पेठ बीड याचेकडुन सोन्याची चैन किंमती १,८५,००० रु जप्त करुन आरोपी व मुद्देमाल पुढील तपासकामी पोलीस ठाणे शिवाजीनगर याचे ताब्यात देण्यात आले आहे. सदरील कामगिरी हि श्री नवनित काँवत, पोलीस अधीक्षक,बीड, श्री सचिन पांडकर, अपर पोलीस अधिक्षक बीड, पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार विकास राठोड, अंकुश वरपे, राहुल शिंदे, पोलीस अंम लदार आशपाक सय्यद, मनोज परजणे, चालक नितीन वडमारे पोलीस ठाणे शिवाजीनगर येथील दिलीप राठोड, रामकृष्ण रहाडे यांनी केली आहे.

## अजितदादा कुंपणच...

बीडमध्ये जिथे ३३% झाडांची घनता असायला हवी तिथे गेली ५–६ वर्षे फक्त २.५% वृक्षच शिल्लक आहेत. अवैध लाकूड तस्करी आणि वृक्षतोड मोठ्या प्रमाणात सुरू असतानाही वनविभाग कारवाई टाळतो, हेच 'कुंपणच शेत खात आहे' याचे जिवंत उदाहरण असल्याची टीका त्यांनी केली. नियम फक्त कागदावर– सा मिल सुरू करण्यासाठी परवान्यांसोबत काटेकोर अटी असतात. प्रत्येक मिलवर तपासणीसाठी वन विभागाचा कर्मचारी नियुक्त असतो. लाकूड वाहतुकीसाठी वैध व्हन पास, रोख–पावत्यांची नोंद, नियमित वह्या तपासणी– हे सर्व बंधनकारक. पण प्रत्यक्षात – तपासणी होत नाही. कर्मचारी–सा मिल चालकांच्या संगनम ताने नियमांना पायदळी तुडवलं जातं. गोल, चिरलेले किंवा वाया गेलेले लाकूड बिनदिक्कतरीत्या ठेवले जाते. खोटी हरित प्रतिमा ? डॉ. ढवळे यांचा आरोप आहे की एका हाताने झाड लावा म्हणणारे प्रशासन दुसऱ्या हाताने झाडं तोडणाऱ्यांचे संरक्षण करते – म्हणूनच अजितदादांनी स्वतः लक्ष घालून वन विभागाच्या अधिकाऱ्यांना फैलावर घेत सा मिलवर नियमित तपासणी आणि कठोर कारवाईचे आदेश द्यावेत, अशी मागणी त्यांनी केली.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## महत्वाचे

## रेशीम उद्योग करणाऱ्या शेतकऱ्यांनी ५० टक्के अनुदानासाठी अर्ज सादर करावेत

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हयात रेशीम शेती केली जाते. तसेच जिल्ह्यात सन २०२५-२६ करिता १५०० शेतकऱ्यांनी तुती लागवडीसाठी नोंदणी केलेली असून रेशीम उद्योगात वर्षाकाठी ३ ते ४ पिकातून २.५ ते ३.०० लक्ष उत्पादन निघत असल्याने शेतकरी रेशीम शेतीकडे वळत असल्याचे दिसून येते. या पिकासाठी सध्या उझी या कीटकाचा प्रादुर्भाव जाणवत आहे. यामुळे पिकामध्ये ३० ते ५० टक्के पर्यंत घट होऊ शकते त्यासाठी शेतकऱ्यांनी उझीनेट व फेरोमन कीटचा अवलंब करणे गरजेचे आहे. या अनुषंगाने जिल्हा परिषदेने सन २०२५-२६ करिता नैसर्गिक शेती प्रोत्साहन योजना अंतर्गत उझीमाशी कीड नियंत्रण या घटकासाठी ५० टक्के अनुदानावर नायलॉन जाळी व चार बॉक्स फेरोमन स्ट्राप ट्रॅप खरेदीसाठी योजना सुरू करण्यात आलेली आहे. यासाठी रेशीम उद्योग करणाऱ्या शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी तालुकास्तरावरील पंचायत समितीमधील कृषीविभागाकडे मागणी अर्ज उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. मागणी अर्ज संबंधित कार्यालयास १ महिन्याच्या आत जमा करावयाचे आहेत. अर्जासोबत कोष विक्रीची पावती आणि अर्जावरील इतर कागदपत्र जसे सातबारा, ८अ, बँक पासबुक, आधार कार्ड इत्यादी कागदपत्र देणे आवश्यक आहे. या अर्जाची छाननी होऊन पूर्वसंमती झालेल्या शेतकऱ्यांना कळविण्यात येणार असून पूर्वसंमती मिळालेल्या लाभार्थ्यांनी त्यांच्या शेडच्या साईजनुसार मच्छरदाणी नेट किंवा नायलॉन नेट खरेदी करून शेडमध्ये लावणे तसेच फेरोमन ट्रॅप चार बॉक्स खरेदी करून त्याचे जीएसटी देयक संबंधित पंचायत समिती मधील कृषी विभागाकडे सादर करावेत त्यानंतर कृषी विभाग (पंचायत समिती) व रेशीम विभागाचे कर्मचारी यांच्याकडून साहित्याची पाहणी होऊन ५० टक्के अनुदानाची रक्कम संबंधित लाभार्थ्याच्या खात्यावर वर्ग होणार आहे.

## जिल्हा परिषद उपकर योजनेसाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हयातील सर्व शेतक-यांनी जिल्हा परिषद उपकर योजना सण २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी नैसर्गिक शेती प्रोत्साहन योजने अंतर्गत गांडुळ खत निर्मिती या घटकासाठी ५० टक्के अनुदानावर गांडुळखत बेड व कल्चर त्याच प्रमाणे रेशीम शेती विकास कार्यक्रम अंतर्गत उझी माशी कीड नियंत्रण या घटकासाठी ५० टक्के अनुदानावर नायलॉन नेट, जाळी व फेरोमन सापळे खरेदीसाठी योजना सुरु झाली आहे. उपरोक्त योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र शेतकरी लाभार्थ्यांचे अर्ज मागविण्यात येत असून या योजनेचा लाभ घेण्यासाठी ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत पंचायत समिती येथे अर्ज सादर करावेत. योजनेच्या सविस्तर माहितीसाठी आपले क्षेत्र व आपले गांव ज्या पंचायत समिती अंतर्गत येत असेल तेथील कृषी अधिकारी, विस्तार अधिकारी (कृषी) पंचायत समिती यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी एस.एस.सय्यद यांनी केले आहे.

दैनिक मराठवाडा पत्र दि. ०६/०८/२०२५

**टी.सी. हरवला आहे.**

आन्नासाहेब कल्याण पदमुले या नावाचा इयत्ता १२ वी पास चा टी.सी. बीड ते बेलापुरी प्रवासा दरम्यान हरवला आहे. कोणाला सापडल्यास मो. नं. ९२८४२११५८१ संपर्क करावा.

# आई वडिल आणि संत सेवा करा: ढोले महाराज

## गोरक्षनाथ टेकडी येथे सचिन महाराज ढोले यांची कीर्तन सेवा

**बीड । प्रतिनिधी**

सध्याची परिस्थिती पाहता समाजात विरोधी टोकाच्या भूमिका घेणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मानसन्मान कोणाचा करायचा आणि दूर कोणाला ठेवायचे याचे भान तरुण पिढीला राहिले नाही आई-वडील वृद्धाश्रमात तर गुरूंचाही सन्मान होत नाही अशा परिस्थितीत आजच्या तरुण पिढीने आई-वडील आणि संत सेवा करावी असे आव्हान ढोले महाराज यांनी केले.





विसाव्या शतकातील महान संत सद्गुरु किसनबाबा महाराज यांच्या २७ व्या पुण्यस्मरणार्थी गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताह होत आहे. या सप्ताह मध्ये मंगळवारी कीर्तन सेवा ह.भ.प. सचिन महाराज ढोले यांनी अभंग विवेचन करताना सांगितले आज समाज मध्ये खूप मोठी शोकांतिका आहे. तरणी पोर आई वडिलांना सांभाळत नाही वृद्धाश्रम वाढत आहे. शाळेत तुम्ही सर्व शिकला असाल एक दोन पासून अणुबाँब पर्यंत सर्व काही शिकवतात पण आई वडिलांना सांभाळा हे कोणत्याच अभ्यासक्रमात नाही आई वडिलांची सेवा करा हे फक्त नी फक्त कीर्तनात शिकवतात जगाच्या पाठीशी तुमच्या जवळ दोन देव आहेत एक आई व दुसरी बाप या दोन देवाची सेवा करा जीवनात काहीही कमी पडणार नाही . पुढे सांगताना ढोले महाराज म्हणतात की संत कधी सांगत नाहीत की मी संत आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम महाराज, संत शांतीब्रम्ह एकनाथ महाराज, संत किसन बाबा महाराज, आणि संत गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांनी कधीच सांगितल नाही की मी संत आहे. संताचा गुण आहे संत कधीच तुम्हाला सांगत नाहीत आणि जे ऊर बडवून सांगतात मी संत आहे, मला संत म्हणा म्हणणारे कधीच संत नसतात संतच आयुष्याच समाज कल्यानासाठी आहे. माणस आज पैसे सर्वस्व म्हणून जगत आहे . जीवन जगण्यासाठी पैसे आवश्यक आहे पण पैसाच सर्वस्व म्हणून जगणाऱ्या माणसाला पैसे सुख देऊ शकत नाही. आज करोड रुपये संपत्ती असणारे माणस आहेत त्यांना शांत झोप सुधा लागत नाही केवळ पैसा सुख देऊ शकत नाही म्हणून ढोले महाराज यांनी आपल्या कीर्तन सेवेत विवेचन करताना सांगितले की आई वडील व संताची सेवा करा जीवनात काहीही कमी पडणार नाही. मंगळवारी कीर्तन सेवा समर्पित करताना ढोले महाराज यांना मृदुगसाथ अरुण महाराज कदम व प्रमोद महाराज पदमुले यांनी दिली.

आज मंगळवारी संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या संत ज्ञानेश्वरी ग्रंथावर प्रवचन सेवा जानकीराम महाराज घुमरे यांनी केले केली .प्रवचन कीर्तन, अभंगवाणी, भारुड, हरिजागर करण्यात आला.

## प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुलाच्या स्केटिंग खेळाडूंचा आंतरराष्ट्रीय पातळीवर दबदबा!

**मुंबई । प्रतिनिधी**

दक्षिण कोरियात नुकत्याच पार पडलेल्या २०व्या एशियन रोलर स्केटिंग चॅम्पियनशिप २०२५ मध्ये प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुल (PTKS), विलेपार्ले येथील स्केटिंग खेळाडूंनी अतिशय उज्वल कामगिरी करत भारत आणि महाराष्ट्राचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरवले आहे.




खेळाडूंची उल्लेखनीय कामगिरी पुढीलप्रमाणे: नायशा निशित मेहता - वयोगट १४-१७, मुली सोलो डान्स - सुवर्ण पदक, रिधम हर्षल ममाणिया - वयोगट ११-१४, मुली सोलो डान्स - सुवर्ण पदक, कॅरोलिन फर्नांडिस - रोलर डर्बी - रजत पदक- या उल्लेखनीय यशाबाबत संकुलाचे अध्यक्ष श्री अरविंद रमेश प्रभू म्हणाले,

या सर्व खेळाडूंमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाची गुणवत्ता आहे. त्यांच्याकडे सुवर्णपदक पटकावण्याची प्रचंड क्षमता असून, लवकरच त्यांच्या भारतीय संघात निवडीची घोषणा होईल, असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे. या यशामागे संकुलाचे अध्यक्ष श्री अरविंद रमेश प्रभू, सचिव डॉ. मोहन अनंत राणे, तसेच Skating ssociation of Maharashtra चे अध्यक्ष श्री पुष्पेंद्र कुमार सिंह, प्रशिक्षक व आंतरराष्ट्रीय दर्जाचे पंच श्रीमती आदेश सिंग, आणि कोरियोग्राफर श्री मोनिश कुमार कोटियन यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि योगदान लाभले आहे.

M.V.C. No. 736/2024

**IN THE COURT OF THE IXth ADDL. DIST. JUDGE AND ADDL. M.A.C.T.. BELAGAVI, AT: BELAGAVI**

BETWEEN:
1. Smt: Sharadabai K. Rajput... PETITIONER
AND:
1. Reliance General Insurance Co.Ltd. And others.... RESPONDENTS
CITATION
To,
**The Respondent No.1**
Shri: Ashruba S/o. Ravasaheb Thombare
Age: Major, Occ: Agriculture,
R/o. A/P: Dahipal Wadmauli, Tal: Kaij, Dist: Beed, State: Maharashtra - 431123
(Owner of Tractor No. MH-23/AS-9534)
**The Respondent No.3**
Shri: Navnath S/o. Raosaheb Thombare
Age: 34 years, Occ: Driver,
R/o. Dahipal Wadmuli, Tal: Kaij, Dist: Beed, State: Maharashtra - 431123
(Driver of Tractor No. MH-23/AS-9534)

Whereas, the above named petitioner has filed the petition on death of "Shri: Aravind S/o. Kasu @ Kashinath Rajput" was proceeding by riding the Motor Cycle No. MH-09/DE-7695 by wearing helmet, in a moderate speed, with due care and caution on his correct side of the road, when he came on the spot of the accident i.e. on Kundal to Dudhondi Road, in Kundal village, at that time, driver was driving the Tractor No. MH-23/AS-9534 in a very high speed all of sudden dashed to the Motor cycle and to the deceased from opposite side and thereby caused the accident on 05-01-2024 at about 7:30 p.m. and thereafter the deceased was died in the said accident and thereafter deceased legal heir has filed the claim petition against tractor owner, its insurer and its driver by claiming the compensation an amount of Rs.80,00,000/-, this court has issued notice by R.P.A.D. to the Respondents No.1 & 3's addresses as per R.C., and driving license address respectively, but the said R.P.A.D. envelopes are returned as addressee "Not Found".

Therefore, take the notice that, the top numbered petition has been posted on 04-09-2025 for your appearance and to file an objection to the petition if any, TAKE NOTICE that, in case of your failure to appear on the said date aforesaid at 11.00 a.m. the case will be heard and proceeded by placing you ex-partie.

Given under my hand and the seal of this office on this 04 day of August 2025.

**sd/-**
**Bench Shirastedar**

**sd/-**
**(M.V. Angadi)**
**Advocate for Petitioners**

**By order of Court**
**Sd-**
**(Chief Administrative Officer)**
**District Court, Belagavi.**

## जाहीर प्रगटन

### मा. श्री. एस. एस. घोरपडे, तदर्थ जिल्हा न्यायाधीश- १, बीड यांचे न्यायालयात

**दिवाणी किरकोळ अर्ज क. : २५५/२०२५**

अर्जदार- गोकुळ पि. बप्पाजी धस,
वय ४३ वर्षे, धंदा शेती, रा. तळणेवाडी, ता. गेवराई, जि. बीड
विरूध्द
गैरअर्जदार- महाराष्ट्र शासन मार्फत जिल्हाधिकारी, बीड ता. जि. बीड
मागणी- अज्ञानाचे नावे असलेली मालमत्ता हस्तांतरण/विक्री करण्याची परवानगी मिळणे बाबत

ज्याअर्थी अर्जदार गोकुळ पि. बप्पाजी धस, वय ४३ वर्षे, धंदा शेती, रा. तळणेवाडी, ता. गेवराई, जि. बीड यांनी या न्यायालयात असा अर्ज दिला आहे की, अर्जदाराचा अज्ञान मुलगा नामे कु. परसुराम गोकुळ धस, वय १५ वर्षे अर्जदार यांचे वडील असुन अज्ञानाचे पालक म्हणून नेमणुक व अज्ञानाचे नावे असलेली मौजे तळणेवाडी ता. गेवराई, जि. बीड येथील गट नं. ३१० मधील एकुण क्षेत्र हे.००-८० आर ज्याची चतु:सिमा पुर्वेस अर्जदार परसुराम गोकुळ धस यांची जमीन पश्चिमेस बप्पा ढेंबरे यांची जमीन, दक्षिणेस नाला व उत्तरेस चंद्रभान आबासाहेब यांची जमीन असे असून सदर गट नं. ३१० मधील एकुण क्षेत्र हे ००-८० आर पैकी ०-४० आर जमीन विक्री करण्यास परवानगी व अज्ञान पालक म्हणून नेमण्याची परवानगी मिळणे बाबतचा अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी कोणास यासंबंधी आक्षेप असेल तर त्यांनी सदरील प्रगटन प्रसिध्दीपासून (३०) तीस दिवसांच्या आत या न्यायालया समोर स्वतः किंवा वकिलामार्फत हजर रहावे, अन्यथा अर्जाची सुनावणी होवून नियमाप्रमाणे आदेश दिला जाईल.

ज्याअर्थी कोणास यासंबंधी आक्षेप असेल तर त्यांनी सदरील प्रगटन प्रसिध्दीपासून (३०) तीस दिवसांच्या आत या न्यायालया समोर स्वतः किंवा वकिलामार्फत हजर रहावे, अन्यथा अर्जाची सुनावणी होवून नियमाप्रमाणे आदेश दिला जाईल.

आज दिनांक ०२/०८/२०२५ रोजी माझे सहिने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**प्रकरणातील पुढील तारीख : ०८/०९/२०२५.**
**अर्जदारातर्फे वकिल : ॲड. के. व्ही. दाभाडे**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहा. अधिक्षक**
**जिल्हा न्यायालय , बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

शिक्का

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. १८२/२०२५**
**चंदू रंगनाथ जायभाये विरुध्द ग्रा.पं. कार्या. खंडाळा**

पहा
**१. चंदू रंगनाथ जायभाये , रा.खंडाळा ता.जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक **उन्नती चंदू जायभाये** यांचा दिनांक ०२/०६/२०१२ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्राम पंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास खंडाळा ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे खंडाळा ता.जि. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २८/०७/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.
**सदर प्रकरणात पुढील तारीख ११/०८/२०२५ ही आहे.**

शिक्का

**(स्वाक्षरीत)**
**तहसिलदार,**
**बीड.**

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ७४/२०२५**
**जफर अजहर पठाण विरुध्द मुख्या.न.प.बीड**

पहा
**१.जफर अजहर पठाण, रा.नगररोड, बालेपीर बीड, ता.जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक **पठाण सालेहा बेगम पठाण अकबर खान** यांचा दिनांक ०४/०७/१९९० रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्राम पंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास **न.प.बीड** ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे **न.प.बीड** ता.जि. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २८/०७/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.
**सदर प्रकरणात पुढील तारीख ११/०८/२०२५ ही आहे.**

शिक्का

**(स्वाक्षरीत)**
**तहसिलदार,**
**बीड.**

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. २१७/२०२५**
**शेख नसरूद्दीन शेख अल्लाउद्दीन विरुध्द ग्रा.पं. कार्या.परभणी (के)**

पहा
**१.शेख नसरूद्दीन शेख अल्लाउद्दीन , रा.परभणी (के) ता.जि. बीड (ह.मु.बीड)**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक **शेख नसरूद्दीन शेख अल्लाउद्दीन** यांचा दिनांक ०५/०६/१९८५ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास **परभणी (के)** ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे **परभणी (के)** ता.जि. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २७/०७/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.
**सदर प्रकरणात पुढील तारीख ११/०८/२०२५ ही आहे.**

शिक्का

**(स्वाक्षरीत)**
**तहसिलदार,**
**बीड.**

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. १६४४/२०२४**
**साक्षी प्रकाश खोड विरुध्द ग्रा.पं. कार्या. काटवटवाडी**

पहा
**१. साक्षी प्रकाश खोड, रा. काटवटवाडी ता.जि. बीड (रेणुकानगर, बीड)**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक **साक्षी प्रकाश खोड** यांचा दिनांक ०९/०५/२००६ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास काटवटवाडी ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे काटवटवाडी ता.जि. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २१/०७/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.
**सदर प्रकरणात पुढील तारीख ०९/०८/२०२५ ही आहे.**

शिक्का

**(स्वाक्षरीत)**
**तहसिलदार,**
**बीड.**

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. १७७/२०२५**
**रमेश रंगनाथ जायभाये विरुध्द ग्रा.पं. कार्या. खंडाळा**

पहा
**१. रमेश रंगनाथ जायभाये , रा.खंडाळा ता.जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक **आर्या रमेश जायभाये** यांचा दिनांक २८/११/२०१९ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्राम पंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास खंडाळा ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे खंडाळा ता.जि. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २१/०७/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.
**सदर प्रकरणात पुढील तारीख ११/०८/२०२५ ही आहे.**

शिक्का

**(स्वाक्षरीत)**
**तहसिलदार,**
**बीड.**

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. २२६/२०२५**
**अमजद हमीद पठाण विरुध्द ग्रा.पं. कार्या.आनंदवाडी**

पहा
**१.अमजद हमीद पठाण , रा.खाजा कॉम्प्लेक्स, बीड ता.जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक **उम्मे कुलसूम अमजद पठाण** यांचा दिनांक ३१/०५/२०११ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्राम पंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास आनंदवाडी ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे आनंदवाडी ता.जि. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक / /२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.
**सदर प्रकरणात पुढील तारीख / /२०२५ ही आहे.**

शिक्का

**(स्वाक्षरीत)**
**तहसिलदार,**
**बीड.**

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. २१८/२०२५**
**शेख मुस्तफा शेख अल्लाउद्दीन विरुध्द ग्रा.पं. कार्या.परभणी (के)**

पहा
**१.शेख मुस्तफा शेख अल्लाउद्दीन , परभणी (के) ता.जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक **शेख मुस्तफा शेख अल्लाउद्दीन** यांचा दिनांक ०७/०७/१९७९ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास **परभणी (के)** ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे **परभणी (के)** ता.जि. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २८/०७/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.
**सदर प्रकरणात पुढील तारीख ११/०८/२०२५ ही आहे.**

शिक्का

**(स्वाक्षरीत)**
**तहसिलदार,**
**बीड.**

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
# मराठवाडा पत्र
• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेषांक • गुरूवार, दि. ०७ ऑगस्ट २०२५ • पान ४



• रेणुका कला केंद्रात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध शाखेचा छापा
• दोन पीडित महिलांची सुटका
• तिघांवर ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद
• पीएसआय पल्लवी जाधव टीम ची कामगिरी

## लोककला केंद्रात संस्कृतीचे वस्त्रहरण !
## कला केंद्रांचा प्रश्न पुन्हा एरणीवर
## लोककलेच्या नावाखाली वेश्या व्यवसाय !

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक मंडळ व राज्य शासनाने लोक कलावंत जिवंत राहावी यासाठी लोककला केंद्रांना अटी व शर्तीच्या नियमा खाली लोककला सादर करण्याची रीतसर परवानगी दिली आहे. मागील काही वर्षात लोककला केंद्रात लोककलेच्या नावाखाली अश्लील नृत् व वेश्या व्यवसाय सुरू असल्याने महाराष्ट्राची लोककला बदनाम होत आहे. काही दिवसापूर्वी केज येथेच महालक्ष्मी नावाच्या लोककला केंद्रात पोलिसांनी छापा मारत पीडित महिलांची सुटका केली होती. महालक्ष्मी कला केंद्राला शासनाने सील केले आहे यातच केजमधील सारुळ गाव, केज कडे जाणाऱ्या रोडवर रेणुका कलाकेंद्रा मधे चालणाऱ्या वेश्याव्यवसायावर छापेमारी करण्यात ▶▶ उर्वरित पान २ वर

**• लोक कलावंत केंद्राची तपासणी होणे गरजेचे**

राज्याची लोककला जिवंत राहावी व लोककलाकार कला सादर करत आपली उपजीविका भागवावी यासाठी लोककला केंद्रांना परवाना देण्यात आलेले आहे मात्र मागील काही वर्षात डीजेच्या तालावर अश्लील नृत्य सादर करण्यात येते. यामुळे कलाकारावर उपासमारीची वेळ आली आहे. ढोलकी वादक हार्मोनियम वादक यासह गायक गायिका यांच्या पोटावर पाय पडलेला आहे एका बंद खोलीत डीजे लावून हिंदी गाण्यावर नृत्य सादर केले जाते. याची चौकशी होणे गरजेचे झाले आहे लोककला केंद्रा त विषया व्यवसाय सुरू असल्याची चर्चा नेहमीच असते मात्र बीड जिल्ह्यातील केज येथे असलेल्या दोन कला केंद्रावर असाच प्रकार घडला यामुळे लोककला केंद्रे हे राज्याची संस्कृती जिवंत ठेवण्यासाठी का अश्लील नृत्य सादर करण्यासाठी आहे .

## महादेव मुंडे यांच्या हत्येविषयी माहिती देणाऱ्यास बक्षीस
## एसआयटी प्रमुख पंकज कुमावतांचे थेट नागरिकांना आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

महादेव मुंडे खून प्रकरणाचा तपास करण्यासाठी राज्य सरकारकडून नियु करण्यात आलेल्या एस.आय.टी.चे प्रमुख पंकज कुमावत यांनी आता नागरिकांना थेट आवाहन केलंय. महादेव मुंडे यांच्या खून प्रकरणाची कुठलीही माहिती असल्यास त्यांनी ती पोलिसांनी द्यावी, असे आवाहन पंकज कुमावत यांनी केलं आहे. त्यासाठी कुमावत यांनी त्यांचा



व्हाटसअप नंबर दिला असून ज्याला कुणाला या प्रकरणाची माहिती असेल ती त्यावर द्यावी असेही सांगण्यात आले आहे. सोबतच माहिती देणाऱ्याचे नाव कुठल्याही परिस्थितीत उघड केले जाणार नसल्याचेही ग्वाहीही देण्यात आली आहे. तसेच माहिती देणाऱ्याला बक्षीस देखील देण्यात येणार असल्याचे एका प्रसिद्धी पत्रात म्हटले आहे.

पंकज कुमावत यांनी केली घटनास्थळाची पाहणी –

▶▶ उर्वरित पान २ वर

## आडस, होळ, बनसारोळा, युसुफवडगाव, चनई, मोरेवाडी ग्रामपंचायतींना नवीन इमारतीसह नागरी सुविधा कक्ष मंजूर

### आ. नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्याला यश

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

राज्यातील ग्रामीण भागातील प्रशासनाला आधुनिक आणि सुसज्ज पायाभूत सुविधा मिळाव्यात या उद्देशाने राज्य सरकारने ५०० नव्या ग्रामपंचायत इमारतींच्या बांधकामास मंजुरी दिली आहे. या यादीत केज विधानसभा मतदार संघातील आडस, होळ, बनसारोळा, युसुफवडगाव चनई आणि मोरेवाडी या ग्राम पंचायतींचाही समावेश आहे. विशेष म्हणजे, या प्रस्तावासाठी केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना आता यश आले असून, शासनाच्या या निर्णयामुळे या भागातील ग्रामपंचायतींना सुसज्ज व आधुनिक पायाभूत सुविधा मिळणार आहेत.

पुनर्रचित राष्ट्रीय ग्रामविकास अभियान अंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात ही कामे हाती घेण्यात येणार आहेत. या योजनेतून नव्या ग्रामपंचायत इमारतींसोबत नागरी सुविधा कक्षाची उभारणी केली जाणार आहे. या ठिकाणी नागरिकांना जन्म-मृत्यू दाखले,

▶▶ उर्वरित पान २ वर



## 'जिल्हा क्रीडा संकुला'ला ना. अजितदादांनी दिला 25 कोटींचा निधी



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा क्रीडा संकुलाला उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांनी २५ कोटी रुपयांचा भरघोस निधी मंजूर केला आहे. बुधवारी (दि.६) रोजी झालेल्या बैठकीत हि मंजुरी देण्यात आली. बीड

### आ.संदीप क्षीरसागरांनी मानले आभार

मतदारसंघासह जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रा संबंधित विकासाला चालना दिल्याबद्दल चालना दिल्याबद्दल आ.संदीप क्षीरसागर यांनी ना.अजित दादा पवार यांचे आभार मानले आहेत.

बीड शहरात असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुल याठिकाणी अनेक विकास कामे होणे आवश्यक होते. याबाबत आ.संदीप क्षीरसागर गेल्या अनेक दिवसांपासून पाठपुरावा करत होते. बीड विधानसभा मतदारसंघ आणि बीड जिल्ह्यातील विविध खेळाडू या ठिकाणी सरावासाठी असतात. त्यांना दर्जेदार सुविधा आणि आवश्यक संसाधने यांची उपलब्धता असणे क्रमप्राप्त आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

## साखळी चोरास झडप मारुन पकडल : स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी



**बीड । प्रतिनिधी**

दिनांक ०१.०८.२०२५ रोजी रामकृष्ण लॉन्स बीड येथे मनोज जरांगे पाटील याची सभा होती त्या सभेमध्ये खुप गर्दी होती गर्दीचा फायदया घेवुन चोरानी एकाच्या गळयातील सोन्याची चैन चोरली होती त्याचे फिर्यादीवरुन पोलीस ठाणे शिवाजीनगर गु.र.नं ४१९/२०२५ कलम ३०३(२) बी.एन.एस प्रमाणे दाखल होता. सदरील चोरीस गेलेली सोन्याची चैन चा शोध स्थानिक गुन्हे शाखेचे पथक घेत होती. तांत्रिक बाबीची मदत घेवुन यातील सोन्याची चैन ही अशोक वसंत सदरे यानी चोरल्याची माहीती मिळाली. आरोपीचा शोध सुरु होता परंतु आरोपी मिळत नव्हता. दिनांक ०५.०८.२०२५ रोजी गोपनिय बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, अशोक वसंत सदरे हा चैन चोर नगर नाका बीड येथे थांबलेला असुन सोन्याची चैन विक्री करण्यासाठी जात आहे अशी माहीती मिळाल्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्यास झडप मारुन पकडले व त्याचे पॅन्टच्या खिश्यात चोरीस गेलेली चैन मिळुन आली ती चैन त्याने दिनांक ०१.०८.२०२५ रोजी रामकृष्ण लॉन्स ▶▶ उर्वरित पान २ वर

## अजित पवार यांचा आज दौरा

**बीड । प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांचा दि. ७ ऑगस्ट, २०२५ रोजीचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे असणार आहे. उपमुख्यमंत्री श्री.पवार हे दिनांक ०७ ऑगस्ट रोजी सकाळी ०६.३० वा. विविध विकास कामांची पाहणी करणार

▶▶ उर्वरित पान २ वर




## अजितदादा कुंपणच शेत खातंय!

### वृक्षलागवड एकी बाजूला आणि वृक्षतोड दुसरीकडे जोरात
### सा मिल चालक व वनविभागाच्या मिलीभगतीचा कट ? : डॉ.गणेश ढवळे





**बीड । प्रतिनिधी**

हरित महाराष्ट्राच्या धर्तीवर हरित बीड अभियान राबवून पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या उपस्थितीमध्ये उद्या (दि. ७) ३० लाख वृक्ष एका दिवसात लावण्याच्या उद्दिष्टासह वर्षभरात १ कोटी वृक्षलागवडीचा संकल्प जिल्हा प्रशासनाने जाहीर केला असला, तरी प्रत्यक्षात बीड जिल्ह्यात अवैध वृक्षतोडीचे रॅकेट बिनबोभाटपणे सुरू असून वनविभागातीलच काही अधिकारी आणि सा मिल चालकांची मिलीभगत यात असल्याचा गौडबंगाल सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी उघड केला आहे. केवळ २.५% वनक्षेत्र – मग झाडं कुठे गेली ? ▶ उर्वरित पान २ वर

